IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 3, January 2023

# राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, अंमलबजावणी आणि आव्हाने

**प्रा. डॉ. मुरलीधर पंडीत गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक व व्यवसायिक, अर्थशास्त्र प्रमुख
वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, मुरूड जंजिरा, रायगड

**प्रास्ताविकः–**

शिक्षण हे सामाजिक बदलाचे महत्वपूर्ण माध्यम आहे. राष्ट्रीय दृष्टीकोनातून सर्वांसाठी शिक्षण हा राष्ट्र विकासाच्या संदर्भातला महत्वाचा भाग आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा प्रमुख मार्ग आहे. विविध स्तरावर मानव विकासाचे कार्य करण्याची सर्वात मोठी शक्ती शिक्षणात आहे. त्यादृष्टीने आपल्या देशात विविध कालखंडात शिक्षण व शिक्षण पध्दतीत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. उच्च शिक्षणाच्या विस्ताराची धोरणे आणि विकासासाठी प्रचलित कायद्याच्या चौकटीत आराखडा तयार करावा लागतो. शिक्षणाच्या सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब पडणे आवश्यक असते. गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टिने दुसऱ्या क्रांतीची आवश्यकता जाणवायला लागली. बहुतेक काम हे शारिरीक श्रमापेक्षा जास्त श्रेष्ठ असे साधारणतः मानण्यात येऊ लागल्याने अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेले अर्धकुशल कामगार मिळणे दुरापास्त झाले. नव्या शैक्षणिक धोरणाने सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील समस्या ओळखल्या, आपण कुठे आहोत याची जाण प्रामाणिकपणे या धोरणाने करून दिली. परंतु या प्रामाणिक धोरणांची, प्रामाणिक अंमलबजावणी देखील तितकीच महत्वाची आहे. शैक्षणिक व्यवस्थेची दुरूस्ती मोठया प्रमाणावर करण्याची गरज या शैक्षणिक धोरणाने दर्शवली असून, अत्यंत गांभीर्याने परिस्थितीचे अवलोकन केल्याचे जाणवते. संख्यात्मकतेपासून गुणवत्तापूर्ण दृष्टीकोन असा प्रवास शैक्षणिक क्षेत्राचा होणे या धोरणाच्या संदर्भात अपेक्षित आहे.

**संदर्भः**

**[1].** राष्ट्रीय शिक्षण निती 2020 भारत सरकार.
**[2].** बौध्दीक संपदा हक्क – स्वरूप आणि समस्या प्रशांत प्रकाशन, जळगाव.
**[3].** लोकप्रभा जुलै – 2020
**[4].** महाराष्ट्र टाईम्स – 16 डिसेंबर 2022
**[5].** अर्थसंवाद – मराठी अर्थशास्त्र परिषद–जानेवारी–फेब्रुवारी–मार्च–2022
**[6].** दै.सामना 26 ऑगस्ट 2022
**[7].** Research Journey-International E-Research Journal April-2022.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in